# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,

२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,

फोर्ट, मुंबई ४०० ००१.

मोबाईल ८४२२०६८६५८/९८९२४८३१७८

E-mail:- mail@mchmumbai.org Web site:www.mchmumbai.org


---

| डॉ. रजनी इंदूलकर | डॉ. स्वानंद सोनार | डॉ. विलास हरपाळे |
|---|---|---|
| अध्यक्षा, | उपसंचालक होमिओपॅथी | प्रशासक, महोप |
| होमिओपॅथी सल्लागार समिती | सदस्य सचिव | सदस्य, होमिओपॅथी |
| महाराष्ट्र शासन | होमिओपॅथी सल्लागार समिती | सल्लागार समिती |

---

क्र. महोप-अस्था-२०२४ /10305 दि. २७ मार्च २०२४

प्रति,

मा. प्रधान सचिव

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

महाराष्ट्र शासन

मंत्रालय, मुंबई ३२

विषय - मा. उपमुख्यमंत्री(वित्त) यांचेकडे झालेल्या दि. १२.१०.२०२३ रोजी झालेल्या बैठकीतील मुद्दा क्र १ मधील निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र होमिओपॅथिक परिषदेकडे नोंदणीकृत असणाऱ्या व शासनमान्य सर्टिफिकेट कोर्स इन मॉर्डन फार्माकॉलॉजी हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या उत्तीर्ण केलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांची महाराष्ट्र वैद्यक परिषदमध्ये नोंद करणे बाबत वस्तुस्थितीदर्शक व कायदेशीर तरतूदींचा अहवाल सादर करणे बाबत

मा. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद व होमिओपॅथी सल्लागार समिती, महाराष्ट्र शासन यांनी सर्व कायदेशीर बाबींचा उहापोह करुन तयार केलेला सविस्तर अहवाल व त्याचा सारांश आपल्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

धन्यवाद, आपले विश्वासू,

Bhadwe

20/3/2024

Marpe

| डॉ. रजनी इंदूलकर | डॉ. विलास हरपाळे |
|---|---|
| अध्यक्षा, | प्रशासक |
| होमिओपॅथी सल्लागार समिती | महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद |
| महाराष्ट्र शासन | मुंबई |

ISSUED

Outward No. 10305 Date 27/3/24

Sign.

O/C

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,

२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
मोबाईल ८४२२०६८६५८/९८९२४८३१७८
फोन २२७०४४००,२२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६
E-mail@mchmumbai.org Web site:www.mchmumbai.org


---


डॉ. रजनी इंदूलकर
अध्यक्षा,
होमिओपॅथी सल्लागार समिती
महाराष्ट्र शासन

डॉ. स्वानंद सोनार
उपसंचालक होमिओपॅथी
सदस्य सचिव
होमिओपॅथी सल्लागार समिती

डॉ. विलास हरपाळे
प्रशासक, महोप
सदस्य, होमिओपॅथी
सल्लागार समिती


---

क्र. महोप-अस्था-२०२४ दि. २७ मार्च २०२४

प्रति,
मा. प्रधान सचिव
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ३२

**विषय - मा. उपमुख्यमंत्री(वित्त) यांचेकडे झालेल्या दि. १२.१०.२०२३ रोजी झालेल्या बैठकीतील मुद्दा क्र १ मधील निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र होमिओपॅथिक परिषदेकडे नोंदणीकृत असणाऱ्या व शासनमान्य सर्टिफिकेट कोर्स इन मॉर्डन फार्माकॉलॉजी हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या उत्तीर्ण केलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांची महाराष्ट्र वैद्यक परिषदमध्ये नोंद करणे बाबत वस्तुस्थितीदर्शक व कायदेशीर तरतूदींचा अहवाल सादर करणे बाबत**

संदर्भ - १)महाराष्ट्र विधी मंडळातर्फे पारित केलेल्या महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम १९५६(सुधारित २०१४)व महाराष्ट्र समचिकित्सा व्यावसायिक अधिनियम १९६० (सुधारित २०१४) मधील तरतूदी

२) सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी सुरु करणे बाबत महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेला दि. १३ ऑगस्ट २०१४ रोजीचा शासन निर्णय

३) आव्हान याचिका क्र. ७८४७/२०१४ मध्ये इंडियन मेडिकल असोसिएशनने अंतरिम दिलासासाठी दाखल केलेल्या सिव्हिल ॲप्लीकेशन दि. २ फेब्रुवारी २०१५ मध्ये न्यायालयाकडे केलेली प्रार्थना

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY

४) सिव्हिल ॲप्लीकेशन दि. २ फेब्रुवारी २०१५ निकाली काढताना मा. उच्च न्यायालयाने नोंदविलेली निरीक्षणे व दिलेल्या सूचना

५) उपरोक्त सिव्हिल ॲप्लिकेशन निकाली काढल्यानंतर शासनाने सहाय्यक सरकारी वकिल श्री. बी.व्ही. सावंत यांच्या अध्यक्षतेंखाली शासकीय अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार शासनाने महोपला दिलेले निर्देश

६) उपरोक्त बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने शासनाच्या सूचनेप्रमाणे महोप ने संकेतस्थळ व वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेले जाहिर प्रकटन

७)मुख्यत्यारचंद विरुध्द पंजाब सरकार या (रिट पिटीशन नं. २३/१९९७ आणि विशेष अनुमती याचिका ८४२२/१९९५) केसमधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल

८) सुभाषीस बक्षी विरुध्द पश्चिम बंगाल वैद्यकीय परिषद (सिव्हिल अपिल १५२/१९९४) मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल.

मा. महोदय,

महाराष्ट्र विधी मंडळाने जून २०१४ मध्ये महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम व महाराष्ट्र समिचिकित्सा व्यवसायी अधिनियम यामध्ये दुरुस्ती करुन महाराष्ट्र होमिओपॅथिक परिषदेकडे नोंदणीकृत असणाऱ्या व महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी उत्तीर्ण झालेल्या नोदंणीकृत वैद्यकीय व्यासायिकांना होमिओपॅथिक औषधोपचारा बरोबरच उपरोक्त कोर्सद्वारे त्यांनी प्राप्त केलेल्या ज्ञानाच्या कक्षेत आधुनिक चिकित्सा पध्दतीची औषधे वापरुन व्यवसाय करण्यास अनुमती दिली आहे.

सदर अधिनियम दुरुस्तीला इंडियन मेडिकल असोसिएशन पुणे शाखेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. ७८४७/२०१४ द्वारे आव्हान दिले असले तरी मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी याचिकाकर्त्यांना कुठलाही अंतरिम दिलासा दिलेला नाही. व स्थगिती करिता केलेले अर्ज फेटाळून लावले आहेत. त्यामुळे सन २०१६ पासून आजतागायत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठातर्फे उपरोक्त कोर्स नियमितपणे चालू असून त्याचे प्रवेश , परीक्षा, उत्तीर्ण प्रमाणपत्र या सर्व प्रक्रिया चालू आहेत. सीसीएमपी हा पाठयक्रम चालविण्याकरिता काही महाविद्यालयांना विद्यापिठाने मान्यता व संलग्नता प्रदान केल्यानंतर उपरोक्त याचिकेमध्येच याचिकाकर्त्यांनी सिव्हिल ॲप्लीकेशन ३३६८/२०१५ अन्वये कोर्स चालू करण्याकरिता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाने दि. २ नोव्हेंबर २०१५ व दि. २३ नोव्हेंबर २०१५ रोजी काढलेल्या पत्रांच्या कार्यवाहीला स्थगिती मिळावी अशी मागणी केली होती. सदरचे सिव्हिल ॲप्लीकेशन निकाली काढताना न्यायालयाने नोंदविलेली निरीक्षणे व सूचना या बाबतीत महाराष्ट्र शासनाचे सहाय्यक सरकारी वकिल श्री. बी.व्ही. सावंत यांच्या अध्यक्षतेखालील अधिकाऱ्यांच्या गटाने स्वयंस्पष्ट मत दिले आहे. त्यानुसार न्यायालयाने सामान्य नागरिक व या प्रकरणातील

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY

इतर हितसंबंधीय यांना कायदेशीर तरतूदीचा अन्वयार्थ व आवाका याबाबतीत पूर्ण कल्पना असावी यावर लक्ष केंद्रित करुन काही सूचना दिल्या. त्यानुसार संबंधित कोर्स चालू करणे किंवा महाविद्यालयांना संलग्नता देणे याला आजघडीला स्थगिती देण्याची काहीही गरज नसून केवळ प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांना संबंधित प्रक्रिया ही याचिका क्रमांक ७८४७/२०१४ च्या अंतिम निर्णयास बांधील असेल असे स्पष्ट केले होते. तसेच प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व संबंधित नोंदणीकृत होमिओपॅथिक व्यावसायिकांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाने प्रवेशावेळी तसे सूचीत करावे असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे विद्यापीठ आजतागायत प्रत्येक प्रवेशाच्या वेळी कार्यवाही करीत आहे. तसेच २०१५ मध्ये (उपरोक्त सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करतेवळी) ९ महाविद्यालंयापुरती असलेली प्रक्रिया आजमितीला जवळपास ४० वैद्यकीय महाविद्यालयात चालू आहे. यावर २०१५ नंतर मूळ याचिका कर्त्यांनी कुठलाही आक्षेप घेतलेला नाही. किंवा तथाकथित दाव्याप्रमाणे सिव्हिल ॲप्लीकेशन निकाली काढताना मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन होत असल्याबाबत कुठलीही तक्रार केलेली नाही. कारण मुळातच उच्च न्यायालयाच्या निर्देशांचा चूकीचा अर्थ लावून महाराष्ट्र वैद्यक परिषद सीसीएमपी उत्तीर्ण नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांचे हक्क नाकारण्याची मनमानी करीत असून कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली संबंधित वैद्यकीय व्यावसायिकांची स्वतंत्र नोंदवहीत नोंद करण्याचे टाळत आले आहे. अर्थात मुंबई समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम दुरुस्ती २०१४, महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम दुरुस्ती २०१४, मुख्यत्यारचंद विरुध्द पंजाब सरकार याप्रकरणात मा. सर्वोच्च न्यायलयाने दिलेला निर्णय, तसेच सुभाषिस बक्षी विरुध्द पश्चिम बंगाल वैद्यक परिषद या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय, हे लक्षात घेता या वैद्यकीय व्यावसायिकाच्या हक्कांना कुठलीही बाधा येत नसून ते आधुनिक चिकित्सा पध्दतीने व्यवसाय करण्यास कायदेशीर दृष्टया सक्षम आहेत. परंतु या वैद्यकीय व्यावसायिकांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमध्ये स्वतंत्र नोंदवहीमध्ये नोंद न केल्यामुळे आधुनिक चिकित्सा पध्दतीचा औषधोपचार करताना महाराष्ट्र वैद्यक परिषदेने तयार केलेल्या नीती व शिष्टाचार संहितेचा भंग झाल्यास महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम दुरुस्ती २०१४ ने कलम १० खंड (क) अनुसार त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे महाराष्ट्र वैद्यक परिषदेला दिलेले अधिकार परिषद वापरु शकत नाही. त्यामुळे राज्यात अशा प्रकारे शिस्तभंग झाल्यास कारवाई न होता गोंधळ माजू शकतो.

महाराष्ट्र वैद्यक परिषदेचा विरोध अतार्किक व अवैध असून केवळ या नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांचे आपल्या हक्कांवर अतिक्रमण होईल ते महाराष्ट्र वैद्यक परिषदेची निवडणूक लढवू शकतील किंवा इतर पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशाकरिता दावा करतील या गैरसमजातून हा विरोध केला जात आहे.

महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम दुरुस्ती २०१४ व महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम दुरुस्ती २०१४ मधील तरतूदींचा योग्य अर्थ लावल्यास संबंधित वैद्यकीय व्यावसायिकांची मूळ नोंदणी ही महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडेच राहणार असून प्रामुख्याने होमिओपॅथी औषधोपचारा बरोबर सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्मॉकॉलॉजीद्वारे प्राप्त ज्ञानाच्या कक्षेतच त्यांना आधुनिक चिकित्सा पध्दतीचा अवलंब करता येणार आहे. त्या बाबतीतील स्पष्ट विवरण महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा पाठयक्रम व

HARASHTRA COUNCIL OF HOMOEOPA

महाराष्ट्र होमिओपॅथिक परिषदेचे जाहिर प्रकटन यामध्ये केलेले आहे. तसेच या वैद्यकीय व्यावसायिकांची महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडे नोंदणी होऊन त्यांना परिषदेचा नियमित नोंदणी क्रमांक दिला जाणार नाही. त्याऐवजी स्वतंत्र नोंदवहीत त्यांची नोंद (एनलिस्टमेंट) होणार असून त्यांना आधुनिक औषधोपचार पध्दती वापरुन व्यवसाय करण्याच्या अनुमती व्यतिरिक्त महाराष्ट्र वैद्यक परिषदेमध्ये इतर कुठलेही हक्क असणार नाहीत. उलट आधुनिक चिकित्सा पध्दतीचे औषधोपचार करताना त्यांच्यावर महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे नियंत्रण राहणार आहे.

उपरोक्त मुख्यत्यारचंद विरुध्द पंजाब सरकार व सुभाषिस बक्षी विरुध्द पश्चिम बंगाल या याचिकांच्या निर्णयाचा आढावा घेतला असता राज्य शासनास एखादी अर्हता राज्य वैद्यक परिषदेच्या नोंदवहीत करणे योग्य वाटत असेल तर भारतीय वैद्यक परिषद अधिनियम १९५६ मधील कलम १५(२)(ब) हे अशा अर्हता राज्य वैद्यक परिषदेच्या परिशिष्ठात नोंद झाल्यानंतर त्या अर्हतांना लागू होत नाही. तसेच right of practice & right of prescribe are synonymous & cant' be seperated from each other असे म्हटले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने महाराष्ट्र वैद्यक परिषदेला सीसीएमपी उत्तीर्ण वैद्यकीय व्यावसायिकांची महाराष्ट्र वैद्यक परिषदेत स्वतंत्र नोंदवहीत नोंद करणे बाबत आदेश द्यावेत तसेच सीसीएमपी उत्तीर्ण होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांना ॲलोपथिक औषधोपचार करण्याची परवानगी असल्याने संबंधित व्यावसायिकांनी दिलेल्या प्रिस्क्रिप्शन प्रमाणे औषध विक्रेत्यांनी औषध विक्री करावी तसेच संबंधित वैद्यकीय व्यावसायिकांना त्यांच्या दवाखान्यात वापरासाठी लागणारी औषधे त्यांच्या नावाने देयक करुन विक्री करावीत याकरिता कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश मा. अन्न व औषध प्रशासनास द्यावेत त्याचबरोबर राज्यातील सर्व मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून जाहिर प्रकटनाद्वारे जनतेस माहिती द्यावी, ही विनंती

सारांश - १) महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६० दुरुस्ती २०१४ अनुसार मूळ अधिनियम कलम २० मधील पोटकलम १२ मध्ये समचिकित्सा वैद्यक पध्दतीने व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र पाठयक्रम उत्तीर्ण करुन त्याद्वारे ग्रहण केलेल्या ज्ञानाच्या व्याप्तीत राज्यात आधुनिक शास्त्रीय वैद्यक पध्दतीने हा मजकूर दाखल करण्यात आला आहे.

२) महाराष्ट्र वैद्यक पषिद अधिनियम १९६५ दुरुस्ती अधिनियम २०१४ अन्वये मुख्य अधिनियम कलम २ खंड (ड) (२) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात आले आहे. " परंतु या खंडातील कोणत्याही गोष्टीचा अर्थ ज्याने राज्य शासनाने मान्यता दिलेला आधुनिक औषधशास्त्र पाठयक्रम उत्तीर्ण केला असेल असा महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६० कलम २ च्या खंड (१६) मध्ये व्याख्या केलेला नोदंणीकृत

RASHTRA COUNCIL OF HOMOEO

व्यवसायी सोडून असा लावला जाणार नाही. (अर्थात या परंतुका अन्वये संबंधित वैद्यकीय व्यावसायिकांना महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियमांन्वये मेडिकल प्रॅक्टिशनर या व्याख्येत सामावून घेण्यात आले आहे. त्यानुसार त्यांना आधुनिक औषधोपचार पध्दतीने वैद्यक व्यवसाय करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.)

३) महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम १९६५ दुरुस्ती अधिनियम २०१४ अन्वये आधुनिक चिकित्सा औषधशास्त्र पाठयक्रम उत्तीर्ण होमिओपॅथिक व्यावसायिकांची स्वतंत्र वहीमध्ये नोंद (एनलिस्टमेंट) करण्याबाबत तरतूद केली असून त्याकरिता मुख्य अधिनियम मधील परिशिष्ठामध्ये क्र. २८ वर आधुनिक वैद्यक चिकित्सा औषधशास्त्र पाठयक्रम याची नोंद करण्यात आली आहे.

४) महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम १९६५ दुरुस्ती अधिनियम २०१४ अन्वये मूळ अधिनियम मधील कलम १० खंड (क) मध्ये वैद्यकीय व्यावसायीच्या या मजकूराच्या अगोदर अनुसूचीच्या नोंद २८ मध्ये समाविष्ट केलेल्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींसह हा मजकूर जादा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे उपरोक्त वैद्यकीय व्यावसायिक हे महाराष्ट्र वैद्यक परिषदेच्य नीती व शिष्टाचार संहितेच्या अधिन राहूनच आधुनिक चिकित्सा पध्दतीची औषधे वापरुन वैद्यकीय व्यवसाय करु शकतील हे स्पष्ट करण्यात आले आहे.

५) महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनिमय दुरुस्ती २०१४ व महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम दुरुस्ती २०१४ याला इंडियन मेडिकल असोसिएशन पुणे शाखा यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र. ७८४७/२०१४ द्वारे आव्हान देऊन केलेली स्थगितीची मागणी उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. तसेच या निर्णयाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात इंडियन मेडिकल असोसिएशन पुणे शाखेतर्फे दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिकेवर विचार करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

६) उपरोक्त अधिनियमाच्या दुरुस्तीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने दि. १३ ऑगस्ट २०१४ जारी केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे सदर अभ्यासक्रम चालू करण्याकरिता कार्यवाही पूर्ण करुन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाने दि. २ नोव्हेंबर २०१५ मध्ये अभ्यासक्रम चालू करु इच्छिणाऱ्या संलग्न महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागितले. तसेच दि. २३ नोव्हेंबर २०१५ च्या पत्रान्वये काही संलग्न महाविद्यालयांना ५० प्रवेश क्षमतेने अभ्यासक्रम चालू करण्यास २०१६-२०१७ करिता मान्यता दिली. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयात याचिकाकर्ते इंडियन मेडिकल असोसिएशन पुणे शाखा यांनी मूळ याचिका ७८४७/२०१४ मध्ये सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करुन स्थगितीची मागणी केली. परंतु न्यायालयाने स्थगितीस नकार देऊन काही मार्गदर्शक सूचनांसह अर्ज निकाली काढला. त्यामध्ये प्रवेश इच्छुक वैद्यकीय व्यावसायिकांना या प्रकरणातील न्यायालयीन याचिकेबद्दल माहिती देण्यात यावी तसेच या पाठयक्रमाकरिताचे प्रवेश व पुढील सर्व कार्यवाही मूळ याचिकेच्या निर्णयास बांधील असतील असे निर्देश दिले.

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY

७) हा सिव्हिल ॲप्लीकेशन न्यायालयाने निकाली काढल्यानंतर राज्य शासनाचे उच्च न्यायालयातील सहाय्यक सरकारी वकिल श्री. बी. व्ही. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कृती गटाने न्यायालयाचा निर्देशां मागील दृष्टीकोन स्पष्ट केला असून त्यामध्ये सदर पाठयक्रम किंवा पाठयक्रम उत्तीर्ण होणारे नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसयिकांना या बाबतीत मा. उच्च न्यायालयाने कुठलीही मनाई केलेली नसून विधी मंडळाने पारित केलेल्या अधिनियम दुरुस्त्या वैध दृष्टया अस्तित्वात असल्याने हा पाठयक्रम पूर्ण करणाऱ्या वैद्यक व्यावसायिकांना द्यावयाच्या मार्गदर्शक सूचना व जनतेला वस्तुस्थिती माहित व्हावी याकरिता महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेने जाहिर प्रकटन वृत्तपत्र व परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे अशी सूचना केली. त्याप्रमाणे जाहिर प्रकटन महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेने राज्य शासनाची संमती घेऊन दि. २३ डिसेंबर २०२० मध्ये प्रसिध्द केले आहे.

८) उपरोक्त विवेचनाप्रमाणे महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडे नोंदणीकृत असणाऱ्या व आधुनिक चिकित्सा औषधशास्त्र पाठयक्रम अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांचा महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम १९६५ मधील तरतूदीनुसार मेडिकल प्रॅक्टिशनर या संज्ञेत समावेश आहे. तसेच त्यांची अर्हता महाराष्ट्र वैद्यक परिषदेच्या परिशिष्ठामध्ये क्र. २८ च्या नोंदीने समाविष्ठ केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये अशा वैद्यकीय व्यावसायिकांना आधुनिक चिकित्सा पध्दतीची औषधे वापरुन रुग्णास औषधोपचार देण्याची मान्यता आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यक परिषदेने या व्यावसायिकांना नीती व शिष्टाचार संहितेच्या कार्यकक्षेत समावेश करण्याकरिता स्वतंत्र्र नोंदवही मध्ये त्यांची नोंद (एनलिस्टमेंट) करणे आवश्यक आहे.

९) सर्वोच्च न्यायालयातील डॉ. मुख्यत्यारचंद आणि इतर विरुध्द स्टेट ऑफ पंजाब व इतर, तसेच सुभाषिस बक्षी व इतर विरुध्द वेस्ट बंगाल मेडिकल कौन्सिल व इतर या याचिकेतील निर्णयाप्रमाणे right of practice & right of prescribe are synonymous & cant' be seperated from each other असे म्हटले आहे. हे लक्षात घेता या वैद्यकीय व्यावसायिकांची रुग्णांना दिलेली प्रिस्क्रिप्शन्स औषध विक्रेत्यांकडून स्वीकारली जाणे व संबंधित वैद्यकीय व्यावसायिकांना त्यांच्या दवाखान्यामध्ये रुग्णांना वितरित करण्यासाठी स्वतःच्या नावावर औषधे खरेदी करणे हे पूर्णपणे कायदेशीर आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने महाराष्ट्र वैद्यक परिषदेला सीसीएमपी उत्तीर्ण वैद्यकीय व्यावसायिकांची महाराष्ट्र वैद्यक परिषदेत नोंद करणे बाबत आदेश द्यावेत तसेच सीसीएमपी उत्तीर्ण होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांना ॲलोपथिक औषधोपचार करण्याची परवानगी असल्याने संबंधित व्यावसायिकांनी दिलेल्या प्रिस्क्रिप्शन प्रमाणे औषध विक्रेत्यांनी औषध विक्री करावी तसेच संबंधित वैद्यकीय व्यावसायिकांना त्यांच्या दवाखान्यात वापरासाठी लागणारी औषधे त्यांच्या नावाने देयक करुन विक्री करावीत याकरिता कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश मा. अन्न व औषध प्रशासनास द्यावेत त्याचबरोबर

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPA

राज्यातील सर्व मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून जाहिर प्रकटनाद्वारे जनतेस माहिती द्यावी, ही विनंती

धन्यवाद,

आपले विश्वासू,

डॉ. रजनी इंदूलकर
अध्यक्षा,
होमिओपॅथी सल्लागार समिती
महाराष्ट्र शासन

डॉ. विलास हरपाळे
प्रशासक
महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद
मुंबई

परिशिष्ट - १)महाराष्ट्र विधी मंडळातर्फे पारित केलेल्या महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम १९५६(सुधारित २०१४)
महाराष्ट्र समचिकित्सा व्यावसायिक अधिनियम १९६० (सुधारित २०१४) मधील तरतूदी

२) सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी सुरु करणे बाबत महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेला दि. १३ ऑगस्ट २०१४ रोजीचा शासन निर्णय

३) आव्हान याचिका क्र. ७८४७/२०१४ मध्ये इंडियन मेडिकल असोसिएशनने दि. २ फेब्रुवारी २०१५ च्या सिव्हिल ॲप्लीकेशन द्वारे अंतरिम दिलासासाठी केलेली मागणी

४) दि. २ फेब्रुवारी २०१५ चा सिव्हिल ॲप्लीकेशन निकाली काढताना मा. उच्च न्यायालयाने नोंदविलेली निरीक्षणे व दिलेल्या सूचना

५) उपरोक्त सिव्हिल ॲप्लिकेशन निकाली काढल्यानंतर शासनाने सहाय्यक सरकारी वकिल श्री. बी.व्ही. सामंत यांच्या अध्यक्षतेंखाली शासकीय अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार शासनाने महोपला दिलेले निर्देश

६) उपरोक्त बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने शासनाच्या सूचनेप्रमाणे दि. १ फेब्रुवारी २०२१ रोजी महोप ने संकेतस्थळ व वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेले जाहिर प्रकटन

७)मुख्यत्यारचंद विरुध्द पंजाब सरकार या (रिट पिटीशन नं. ४२३/१९९७ आणि विशेष अनुमती याचिका ८४२२/१९९५) केसमधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल

८) सुभाषीस बक्षी विरुध्द पश्चिम बंगाल वैद्यकीय परिषद (सिव्हिल अपिल १५२/१९९४) मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल.

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOP